पर्यटन उप विभाग स्तरावर Capacity Building Plan (CBP) तयार करण्यासाठी "Capacity Building Unit (CBU) " गठीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**मादाम कामा रोड, हुतात्मा चौक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,**
**शासन निर्णय क्र.टिडीएस २०२६/०४/प्र.क्र.६९/पर्यटन-१,**
**दिनांक : १२ जून, २०२६**

**संदर्भ:-** १) सदस्य, क्षमता विकास आयोग, भारत सरकार यांचे पत्र क्र.D.O.No.३४६ /Member(Admn.)/CBC-२०२६, दि.०६/०३/२०२६.

२) उप सचिव (प्रशि-५), सामान्य प्रशासन विभाग यांचे पत्रक्र.संकीर्ण-२०२६/प्र.क्र.०७/प्रशि-५, दि.१६/०४/२०२६.

**प्रस्तावना :-**

राज्य शासनाच्या "विकसित महाराष्ट्र २०४७" या उद्दिष्टांच्या अनुषंगाने पर्यटन क्षेत्राचा सर्वांगीण विकास करण्यासाठी पर्यटन विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची कौशल्ये, क्षमता आणि कार्यक्षमता वृद्धिंगत करणे आवश्यक आहे. केंद्र शासनाच्या क्षमता विकास आयोगाने (CBC) प्रत्येक विभागाने स्वतंत्र Capacity Building Plan (CBP) तयार करण्याबाबत संदर्भ क्र.१ अन्वये सूचना देण्यात आल्या आहेत. तद्नंतर, सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये प्रत्येक प्रशासकीय विभागामार्फत क्षमता बांधणी आराखडा तयार करण्यासाठी प्रशासकीय विभाग स्तरावर क्षमता बांधणी घटक (Capacity Building Unit (CBU) गठीत करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.

०२. त्यानुसार पर्यटन विभागाचा क्षमता बांधणी आराखडा तयार करण्यासाठी प्रशासकीय विभाग स्तरावरील क्षमता बांधणी घटक (Capacity Building Unit (CBU) गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

पर्यटन उप विभाग स्तरावर क्षमता बांधणी आराखडा (Capacity Building Plan - CBP) तयार करण्यासाठी खालीलप्रमाणे प्रशासकीय विभाग स्तरावरील Capacity Building Unit (CBU) गठीत करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे:-

| | | |
|---|---|---|
| १. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (पर्यटन) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग | अध्यक्ष |
| २. | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई. | सदस्य |
| ३. | संचालक, पर्यटन संचालनालय, मुंबई | सदस्य |
| ४. | उप सचिव (पर्यटन-२), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई. | सदस्य |
| ५. | उप सचिव (पर्यटन-१), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई. | सदस्य सचिव |
| ६. | सह संचालक, पर्यटन संचालनालय, मुंबई. | सदस्य |
| ७. | उप संचालक, पर्यटन संचालनालय, पुणे | सदस्य |
| ८. | प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, पुणे. | सदस्य |

२. Capacity Building Unit (CBU) ची कार्यकक्षा:-

I. विभागातील कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाशी संबंधित गरजांचे विश्लेषण करणे आणि क्षमता बांधणी आराखडा राबविण्यासाठी 'नोडल संस्था' (Nodal Body) म्हणून काम करणे.

II. विभागातील विविध संवर्गातील पदांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या विचारात घेवून त्यांच्यासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांवर आधारीत क्षमता बांधणी आराखडा तयार करणे. हा आराखडा तयार करताना चालू आर्थिक वर्षातील उद्दिष्टे आणि भविष्यातील गरजा यांचा विचार करावा. तसेच यासाठी 'IGOT-कर्मयोगी' या व्यासपीठावर उपलब्ध असलेल्या AI आधारीत साधनांचा वापर करणे

III. विभागांनी केवळ पारंपारिक प्रशिक्षणावर अवलंबून न राहता, ऑनलाईन प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष प्रशिक्षण (In-person आणि On-the-job training) अशा संमिश्र प्रशिक्षण पद्धतीचा अवलंब करणे.

IV. राज्याने ठरवून दिलेल्या उद्दिष्टानुसार विभागाच्या क्षमता बांधणी आराखड्याची निर्मिती व अंमलबजावणी करणे, नियतकालिक आढावा घेणे.

V. 'IGOT कर्मयोगी' या पोर्टलवर विभागातील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांची नोंदणी (Onboarding) आणि प्रशिक्षणाचे पर्यवेक्षण करणे, तसेच ऑनलाईन अभ्यासक्रम वेळेवर पूर्ण होतील आणि ऑफलाइन कार्यशाळा/प्रशिक्षणांमध्ये कर्मचाऱ्यांचा सहभाग असेल, याची खातरजमा करणे.

VI. सर्व प्रकारच्या प्रशिक्षणासाठी सामान्य प्रशासन विभाग आणि यशदा यांच्याशी समन्वय साधणे.

VII. क्षमता बांधणी आराखड्याच्या प्रगतीचा आढावा घेणे व त्यानुषंगाने वेळोवेळी बैठका आयोजित करणे.

VIII. विभागातील सर्व संवर्गासाठी तयार करण्यात आलेला क्षमता बांधणी आराखड्याबाबतचा अहवाल सामान्य प्रशासन विभागास सादर करणे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०६१२१२२७३७८१२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANTOSH V ROKADE

Digitally signed by SANTOSH V ROKADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Tourism and Cultural Affairs, 2.5.4.20=CA5751FFEDBB005FDFF34AB6AC1F8319D061483D7D35E20F744E251360F7920A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=ECF4A9ABE84C70DE989C3669424C12B6CADCB583D500FE489CE8727916E0BBEE, cn=SANTOSH V ROKADE
Date: 2026.06.12 12:28:47 +05'30'

**(संतोष जया विठ्ठल रोकडे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१. मा.मंत्री (पर्यटन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.राज्यमंत्री (पर्यटन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव (पर्यटन), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई.
५. संचालक, पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

६. उप सचिव (पर्यटन-१), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. उप सचिव (पर्यटन-२), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
८. सह संचालक, पर्यटन संचालनालय, मुंबई
९. उप संचालक, प्रादेशिक कार्यालय, पर्यटन संचालनालय, पुणे.
१०. प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, पुणे.
११. निवडनस्ती (पर्यटन-१)

***